I J R S S I S, Vol. (IX), Issue (1) Jan 2023: 193-198
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतातील बेरोजगारीचे विश्लेषण

मनिषकुमार काशिनाथ कायरकर
अर्थशास्त्र विभाग कला वाणिज्य महिला महाविद्यालय,बल्लारपूर
Corresponding Author :- mkk20dec@gmail.com

| Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023<br>Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :** बेरोजगारी हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी नेहमीच चिंतेचा व चिंतनाचा विषय राहिला आहे. स्वातंत्र्याचे ७५ वर्ष पूर्ण होत असतांना भारतातील बेरोजगारीच्या समस्येचे आजही समाधानकारक निराकरण करता आलेले नाही.उलटपक्षी या समस्येची तीव्रता वर्षागणिक विशेषत: कोरोना महामारीच्या काळात अधिकच तीव्र झालेली दिसते.'जी व्यक्ती कामाचा शोध घेत आहे परंतु कामाची संधी मिळाली नाही अशा व्यक्तीला बेरोजगार समजले जाते.' याचाच अर्थ नोकरीसाठी प्रयत्न न करणाऱ्या व्यक्तीचा बेरोजगारीत समावेश केला जात नाही. मे २०१६ मध्ये भारताची कार्यक्षम लोकसंख्या ही अंदाजे ९५ कोटी होती.पुढील पाच वर्षात त्यात ११ कोटींनी भर पडून ती फेब्रुवारी २०२१ मध्ये अंदाजे १०६ कोटी इतकी झाली. कार्यक्षम लोकसंख्येशी कामगार शक्तीचे;स्ंइवत वितबमद्धप्रमाण लक्षात घेता मे २०१६ मध्ये ९५ कोटी कार्यक्षम लोकसंख्येपैकी ४६ कोटी लोकसंख्या ही कामगार शक्तीचा हिस्सा होती.तर फेब्रुवारी २०२१ मध्ये १०६ कोटी कार्यक्षम लोकसंख्येपैकी ४५ कोटी लोकसंख्या कामगार शक्तीचा भाग होती. कोरोना काळात या प्रमाणात बरीच घसरण झालेली होती. आकडेवारीनुसार मे २०२२ मध्ये उपलब्ध नोकऱ्यांचे प्रमाण ४०.०४ कोटी होते ते जून २०२२ मध्ये एक कोटीने कमी झाले. जानेवारी २०२१ मध्ये भारतातील २० ते २४ आणि २० ते २१ या वयोगटातील बेरोजगारीचे प्रमाण अनुक्रमे ६३ व ४० टक्के होते. सध्या तरूण बेरोजगारीची संख्या ही अंदाजे २५ टक्के इतकी आहे. आतापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा प्रवास हा कृषी पासून सेवाक्षेत्रावर आधारित अर्थव्यवस्था असा राहिला.भारतातील बेरोजगारीच्या आकडेवारीत उच्चशिक्षित कुशल श्रमिकांबरोबरच अल्पशिक्षित किंवा अकुशल श्रमिकांची संख्यासुध्दा बरीच आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला केवळ सेवाक्षेत्राचाच विचार करून चालणार नाही तर वस्तुनिर्मितीच्या क्षेत्राचा विकास अधिक वेगाने कसा होईल याकडेही लक्ष द्यावे लागेल. तसेच स्वयंरोजगाराचे प्रमाण वाढविण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण यासारख्या गोष्टींच्या विकासाकडे विशेषत: लक्ष देणे गरजेचे आहे.

**बिजशब्द :** कार्यक्षम लोकसंख्या,कामगार शक्ती,कौशल्य विकास,कुशल श्रमिक, सेवाक्षेत्र

**प्रस्तावना :**

भारतात बेरोजगारी ही एक समस्या आहे याची जाणीव सर्वप्रथम स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५० च्या दरम्यान सरकारला झाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या घोषणेपर्यंत भारताकडे रोजगार निर्मितीची साधने अत्यंत मर्यादित स्वरूपात उपलब्ध होती.पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून क्षेत्रिय व सर्वांगीण विकासासाठी मध्यमकालीन पाया रचला गेला. श्रमशक्तीत वाढ करणे आणि रोजगार निर्मितीचे लक्ष्य गाठणे हे या योजनेचे एक उद्दिष्टय दिसून येते. सातव्या पंचावार्षिक योजनेत प्रथमच देशाच्या विकासात्मक धोरणामध्ये रोजगार निर्मितीला केंद्रस्थानी ठेवण्यात आले.नवव्या पंचवार्षिक योजनेत राज्यांच्या विकास धोरणाच्या तीन आयामांपैकी एक म्हणून रोजगाराची दखल घेतली गेली. अकराव्या योजनेत 'समावेशक वाढ' यावर लक्ष केंद्रित करतांना रोजगार हा यातला मुख्य घटक असल्याचे मान्य करण्यात आले. एकूणच देशातील बेरोजगारी ही देशाच्या विकासात्मक धोरणाचा एक महत्वाचा पैलू म्हणून सतत लक्षात घेतला जातो आहे.

बेरोजगारीचा अर्थ : बेरोजगारी म्हणजे काम नसलेल्या मात्र रोजगारासाठी उपलब्ध असलेल्या आणि कामाच्या शोधात असलेल्या श्रमशक्तीचा हिस्सा होय. बेरोजगार ही अशी व्यक्ती होय की, जी काम करण्यास सक्षम आहे,चालू वेतनदरावर काम करण्यास इच्छुक व तयार आहे परंतु रोजगाराचा सक्रियपणे शोध घेत असूनही रोजगार उपलब्ध होत नाही. याचाच अर्थ कामाच्या शोधात नसणाऱ्या व्यक्तींचा बेरोजगार म्हणून विचार केला जात नाही. मानवाच्या गरजा आणि इच्छा पूर्ण करणाऱ्या वस्तू व सेवांच्या उत्पादनात न वापरले जाणारे दुर्मीळ मानवी संसाधन म्हणजे बेरोजगारी होय. प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश भारतातील बेरोजगारीच्या वर्तमान परिस्थितीचे विश्लेषण करणे हा आहे.

**संशोधन पध्दती** : प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम माहितीवर आधारित असून याकरिता विविध संदर्भग्रंथ,अहवाल,मासिके तसेच अधिकृत वेबसाईटवरील माहितीचा उपयोग केलेला आहे.

**श्रमशक्ती सहभागीता दर :**

कामगार शक्तीचे आकारमान देशातील विविध क्षेत्राकरिता आवश्यक असलेल्या श्रम पुरवठयाचे प्रमाण निर्धारीत करीत असते.देशाच्या श्रम शक्तीमध्ये विशिष्ट कालावधीत वस्तू व सेवांच्या उत्पादनात श्रम पुरवठा करू शकणाऱ्या १५ वर्षावरील वयाच्या कार्यक्षम लोकसंख्येचा समावेश होतो. २०२१ मध्ये भारतातील श्रमशक्तीचे प्रमाण लोकसंख्याच्या संदर्भात ४७१.३ दशलक्ष इतके होते. २०१७ ते २०२१ या कालावधीतील श्रमशक्तीचे सरासरी प्रमाण ४७१.३८ दशलक्ष श्रमिक इतके होते.यात सर्वात कमी प्रमाण ४५७.८ दशलक्ष २०२२ मध्ये तर सर्वाधिक प्रमाण ४८२.७ दशलक्ष २०१९ मध्ये होते.

श्रमशक्तीचा सहभागीता दर म्हणजे आर्थिकदृष्टया सक्रिय असलेल्या १५ वषपिक्षा अधिक वयाच्या लोकसंख्येचे असे प्रमाण होय, जे विशिष्ट कालावधीत वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी श्रमाचा पुरवठा करतात. २०१७ ते २०२१ या कालावधीत श्रमशक्तीच्या सहभागीता दराची सरासरी ४७.०३ अशी होती. यात सर्वाधिक दर ४८.५८ टक्के हा २०१७ मध्ये तर सर्वात कमी दर ४४.९२ टक्के २०२० मध्ये होता. २०२१ मध्ये श्रमशक्तीच्या सहभागीतेचा दर ४५.५७ टक्के असा होता. २०२१ मध्ये महिला श्रमशक्तीच्या सहभागीतेच्या दराचे प्रमाण १९.२३ टक्के तर पुरूष श्रमशक्तीच्या सहभागीतेचा दर ७०.०९ टक्के होता.

श्रमिकांचा सहभागीता दर सप्टेंबर ते डिसेंबर या तिमाहीच्या काळात २०१७ मध्ये ४३.९७ टक्के होता. याच काळात शहरी श्रमिक सहभागीता दराचे प्रमाण ४२.२ टक्के तर ग्रामीण श्रमिकांच्या सहभागीतेचा दर ४४.८ टक्के असा होता. सप्टेंबर-डिसेंबर २०१९ या काळात शहरी श्रमशक्ती सहभागीता दर ४०.७,ग्रामीण ४३.७ आणि देशातील एकूण श्रमशक्ती सहभागाचे प्रमाण ४२.७१ टक्के होते. याच काळात २०२० मध्ये हा दर काहीसा घसरलेला दिसून येतो. यामध्ये ३७.८ शहरी तर ४१.९ ग्रामीण आणि ४०.५२ टक्के देशातील सहभागीता दर होता. सप्टेंबर-डिसेंबर २०२२ या कालावधीत सहभागीता दराचे प्रमाण पुन्हा कमी झाल्याचे दिसून येते. एकूणच असे निदर्शनास येते की,२०१७ ते २०२२ या कालावधीत श्रमशक्ती सहभागीता दरात घट झाल्याचे दिसून येते.

देशाच्यादृष्टीने युवा श्रमशक्तीला बरेच महत्त्व असते. देशाच्या उत्पादन क्षमतेला सामर्थ्यशाली बनविण्यासाठी युवा श्रमशक्ती महत्त्वाची मानता येईल. १५ ते २४ या वयोगटातील युवा हे युवा श्रमशक्ती या संकल्पनेत येतात. सन २०१७ मध्ये देशाच्या एकूण श्रमशक्तीमध्ये युवा श्रमशक्तीचा सहभागाचा दर हा २७.४१ टक्के होता.जो आधीच्या वर्षाच्या तुलनेत ऋणात्मक होता. २०१९ मध्ये हाच दर २६.५२ टक्के तर २०२१ मध्ये २३.६८ टक्के असा दिसून येतो. याचाच अर्थ २०२१ पर्यंत पुढच्या प्रत्येक वर्षाला एकूण श्रमशक्तीमधील युवा श्रमशक्तीचा सहभागीता दर हा घटत गेल्याचे तालिका क्रमांक १ वरून दिसून येते.

**भारतातील बेरोजगारीचा दर :**

भारतातील बेरोजगारीचा दर सन २०२१ मध्ये ५.९८ टक्के होता जो २०२० च्या तुलनेते २.०२ टक्क्यांनी कमी होता. २०१८ मध्ये बेरोजगारीचा दर हा ५.३३ टक्के २०१९ मध्ये ५.२७ टक्के तर २०२० मध्ये बेरोजगारीचा दर हा ८.०० होता. प्रामुख्याने कोरोना काळातील लॉकडाऊनचा परिणाम म्हणून २०२० मध्ये बेरोजगारीच्या दरात वाढ दिसून येते.गेल्या काही महिन्यांपासून भारतातील बेरोजगारीच्या दराचा आलेख हा चढत्या स्वरूपाचाच असलेला दिसून येतो.सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या अहवालानुसार, नोव्हेंबर २०२२ मध्ये देशातील बेरोजगारीचा दर हा ८ टक्के होता तो वाढून डिसेंबर २०२२ मध्ये ८.३० टक्क्यांपर्यंत गेला. ऑक्टोबरमध्ये हा दर ७.९२ टक्के तर सप्टेंबरमध्ये ६.४३ टक्के होता. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या अहवालानुसार एप्रिल ते जून या तिमाहीत बेरोजगारीचा दर ७.६ टक्के होता तो जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत ७.२ टक्क्यांपर्यंत घसरला होता.पाच वर्षापूर्वी बेरोजगारीचा दर ५ टक्के होता.आता तो ८ टक्क्यांच्या आसपास आहे.

जानेवारी २०२२ मध्ये भारतातील एकूण बेरोजगारीचा दर ६.५६ होता. तर ८.१४ टक्के शहरी तर ५.८ टक्के ग्रामीण बेरोजगारीचा दर होता. पुढच्या काळात शहरी,ग्रामीण आणि एकूणच भारताच्या बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ होत गेल्याचे वरील आलेखावरून दिसून येते. डिसेंबर २०२२ मध्ये शहरी बेरोजगारीचा दर १०.०९, ग्रामीण बेरोजगारीचा दर ७.४४ तर देशातील एकूण बेरोजगारीचा दर हा ८.३ टक्के असा दिसून येतो.

**भारतातील युवा बेरोजगारीचे प्रमाण :**

१५ ते २४ या वयोगटातील युवा बेरोजगारीचे प्रमाण २०१७ मध्ये २२.५८ टक्के होते जे २०१६ च्या तुलनेत ०.३४ टक्क्यांनी अधिक होते.२०१९ मध्ये २२.७४ टक्के युवा बेरोजगारीचा दर होता जो २०१८ च्या तुलनेत उणे ०.३१ असा ऋणात्मक होता.याचाच अर्थ या काळात युवा बेरोजगारीच्या प्रमाणात अल्पप्रमाणात घट झालेली दिसून येते. मात्र पुढील काळात २०२० मध्ये यात २.१६ टक्क्यांनी वाढ होऊन २४.९० टक्के तर २०२१ मध्ये ३.३६ टक्क्यांनी वाढ होऊन २८.२६ टक्के इतका झालेला दिसून येतो. यावरून असे निदर्शनास येते की, गेल्या पाच वर्षात युवा बेरोजगारीच्या दरात पूर्वीच्या तुलनेत वाढ होत गेलेली आहे.

**शहरी ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण :**

शहरी व ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण लक्षात घेता सप्टेंबर ते डिसेंबर २०१७ या कालावधीत शहरी बेरोजगारीचे प्रमाण ५.४ टक्के तर ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण ४.५ टक्के असे होते. तर देशातील एकूण बेरोजगारीचा दर हा ४.७८ टक्के असा होता. तर याच कालावधीत २०१९ मध्ये शहरी व ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण अनुक्रमे ९ आणि ६.८ टक्के तर भारतातील एकूण बेरोजगारीचे प्रमाण ७.५२ टक्के असे होते. सप्टेंबर ते डिसेंबर २०२२ मध्ये शहरी व ग्रामीण बेरोजगारीचा दर हा ८.२ आणि ७.१ टक्के तर भारतातील एकूण बेरोजगारीचा दर हा ७.४७ टक्के असा होता. यावरून असे निदर्शनास येते की, सप्टेंबर-डिसेंबर २०१७ ते सप्टेंबर-डिसेंबर २०२२ या संदर्भीय कालावधीत शहरी,ग्रामीण आणि भारतातील एकूण बेरोजगारीच्या दरात वाढ झालेली आहे.

**सर्वाधिक बेरोजगारीचा प्रदेश :**

राज्यनिहाय बेरोजगारीची संख्या बघता डिसेंबर २०२२ च्या आकडेवारीनुसार सर्वाधिक म्हणजेच ३७.४ टक्के बेरोजगारी ही हरियाणा राज्यात होती. त्या पाठोपाठ २८.५ टक्के राजस्थान, २०.८ टक्के दिल्ली, १९.१ टक्के बिहार, १८ टक्के झारखंड अशी ही वर्तमानात सर्वाधिक बेरोजगारी असलेली राज्ये आहेत.तर सर्वाधिक कमी प्रमाण म्हणजेच ०.९ टक्के हे ओडिसा राज्याचे होते.ऑगस्ट २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत बेरोजगारीच्या दराचा विचार करता हरियाणा राज्यातील बेरोजगारीचा दर हा सातत्याने सर्वाधिक राहिला आहे. राजस्थान,जम्मू काश्मिर,बिहार,त्रिपुरा या राज्यातील बेरोजगारीचा दर हा सातत्याने चढत्या रूपरूपाचा असलेला दिसून येतो.

**समारोप :**

भारतातील बेरोजगारीची समस्या ही नेहमीच देशाच्यादृष्टीने चिंतनाचा विषय राहिला. वाढती लोकसंख्या,आर्थिक विकासाचा दर कमी, लघु व कुटीर उद्योगांचा ऱ्हास अशा विविध कारणांमुळे बेरोजगारीची प्रश्न कायमच देशासमोर समस्या बनुन राहीला आहे. देशातील बेरोजगारीचा उच्च दर देशाच्या विकासात बाधा ठरत असतो. त्यामुळे बेरोजगारी हे देशासाठी एक आव्हान आहे असे लक्षात आल्यापासून भारत सरकारने रोजगार संधी निर्माण करण्यासाठी आणि पर्यायाने बेरोजगारीच्या निर्मूलनासाठी बऱ्याच धोरणात्मक उपाययोजना अंमलात आणल्या. ज्यामध्ये एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम,जवाहर रोजगार योजना,महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना इत्यादी काही प्रमुख संदर्भ देता येतील.सध्याच्या सरकारने प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना,स्टार्ट अप इंडिया आणि स्टँड अप इंडिया अशा प्रकारच्या विविध रोजगाराभिमुख योजना आणल्या आहेत. तथापि भारतातील बेरोजगारीची तीव्रता अपेक्षितपणे कमी करता आली नाही हे सत्य आहे. वरील विश्लेषणावरून निदर्शनास येते की,अजूनही भारतातील ग्रामीण व शहरी क्षेत्रातील बेरोजगारीचा दर हा वाढत्या स्वरूपाचाच आहे. बेरोजगारीची समस्या सुटल्याशिवाय भारताचे भवितव्य उज्ज्वल होऊ शकत नाही.तरूणांना योग्य रोजगार

मिळाला नाही तर देशात शांतता आणि समृध्दी राहणार नाही हे लक्षात घ्यावे लागेल.

**संदर्भ :-**

Datt R & Sundaram K.P.M (2003) Indian Economy, S. Chand Publication New Delhi

Ghose Ajit.K(2020) Employment in India, Oxford UP

दत्त रूद्र आणि सुंदरम के.पी.एम.(२०१८)भारतीय अर्थव्यवस्था,एस.चांद पब्लीकेशन,नवी दिल्ली.

झामरे जी.एन.(२००२) भारतीय अर्थव्यवस्था,पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

https://www.unemploymentinindia.cmie.com

https://www.theglobaleconomy.com/

https://fred.stlouisfed.org/tags/series?t=unemployment%3Bworld+bank

Unemployment Rate of India 2023, Complete State-wise List https://www.studyiq.com/articles/unemployment-rate-in India

https://www.macrotrends.net/countries/IND/india/unemployment-rate

तालीका क्र.१


| 15-24 वयोगटातील श्रमशक्तीचा सहभागीता दर | | |
|---|---|---|
| **वर्ष** | **सहभागीता दर** | **वार्षिक बदल** |
| 2021 | 23.68% | 0.44% |
| 2020 | 23.25% | -3.28% |
| 2019 | 26.52% | 0.09% |
| 2018 | 26.43% | -0.98% |
| 2017 | 27.41% | -1.00% |

https://www.macrotrends.net/countries/IND/india/unemployment-rate


आलेख क्र.१

**श्रमशक्ती सहभागीता दर (LPR)**


संदर्भ सप्टेंबर-डिसेंबर





https://www.macrotrends.net/countries/IND/india/unemployment-rate





Source :https://www.macrotrends.net/countries/IND/india/unemployment-rate





Source : https://www.macrotrends.net/countries/IND/india/unemployment-rate





https://www.macrotrends.net/countries/IND/india/unemployment-rate




Source : https://www.macrotrends.net/countries/IND/india/unemployment-rate




Source : https://unemploymentinindia.cmie.com




Source : https://unemploymentinindia.cmie.com